
सुधाकर तळवडेकर
अबोल हा
पारिजात आहे
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अबोल हा पारिजात आहे

(दीर्घकथा)

## लेखक : सुधाकर अशोक तळवडेकर

# अबोल हा पारिजात आहे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अबोल हा पारिजात आहे (दीर्घकथा)

लेखक :   सुधाकर अशोक तळवडेकर

मोबाईल आणि whatsapp नं. : 8108819800

ई मेल : sudhakartalawadekar8108819800@gmail.com

फेसबूक : https://www.facebook.com/sudhakar.talawadekar

पत्ता : ६,निशिला निवास, ८,जयप्रकाश नगर, रोड नं.२, गोरेगांव (पू), मुंबई ४०००६३

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २८ फ़ेब्रुवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

काही बोलायाचे आहे........



वाचनाची सवय मला लहानपणापासूनच पु.ल.देशपांडे, व.पु.काळे, वि.स.खांडेकर, अशा दिग्गजांनी लावली आणि कथेच्या लिखाणासाठी कोणत्याही गहन विचारांची गरज नसते. ‘जर आपल्या आजू-बाजूला घडणाऱ्या गोष्टींकडे डोळसपणे पहिले तर प्रत्येक माणूस लेखक होऊ शकतो’ हा कानमंत्र मला माझ्या गुरुजींनी लहानपणीच दिला होता. तेव्हापासून मी देखील लिहू लागलो आणि माझे लेखन गुप्त न ठेवता मिळेल त्या माध्यमांतून लोकांपर्यंत पोहोचवू लागलो. लोकांनाही ते आवडू लागले. आता esahity.com च्या माध्यमातून माझी ही कथा ‘**अबोल हा पारिजात आहे '** मी आपल्यापर्यंत पोहोचवतो आहे. या कथेच्या सोयीसाठी काल्पनिक नावांचा वापर केला असला तरी ही कथा माझ्या आयुष्यात घडलेल्या काही सत्य घटनांचा कोलाज आहे. या कथेवरचा आपला अभिप्राय मला खालील माध्यमांतून जरूर कळवा.

सुधाकर अशोक तळवडेकर

मोबाईल आणि whatsapp नं. : 8108819800

ई मेल : sudhakartalawadekar8108819800@gmail.com

फेसबूक : https://www.facebook.com/sudhakar.talawadekar

पत्ता : ६,निशिला निवास, ८,जयप्रकाश नगर, रोड नं.२, गोरेगांव (पू), मुंबई ४०००६३

अर्पणपत्रिका

माझी ही कथा

माझ्या ज्ञात आणि अज्ञात अशा

सर्व रसिकांना समर्पित.

-सुधाकर

दिनांक : 25.06.2016

ऑफिसच्या कामासाठी अंधेरीला एके ठिकाणी जायचे होते. अंधेरीतील एक बसस्टॉपवर बसच्या रांगेत उभा असताना माझं लक्ष सहज रस्त्याच्या पलीकडच्या बसस्टॉपवर उभ्या असलेल्या माणसांवर गेले. तिथल्या एका मुलीला पाहून मी हडबडलो. तिचा चेहेरा मला 'प्राजक्ता'सारखा वाटला. पण हे कसं शक्य होतं? ती तर 8 वर्षांपूर्वी दिल्लीला निघून गेली होती. कदाचित परतही आली असेल. पण तिच्या त्या अवताराकडे पाहून ती प्राजक्ता आहे यावर कोणाचाच विश्वास बसला नसता. मी खात्री करून घ्यावी म्हणून परत एकदा तेथे पाहण्यासाठी मान वळवली पण नेमकी तेव्हाच माझी बस आली. मधेच रांगेतून निघून जाणे शक्य नव्हते. 'असेल तिच्यासारखीच दिसणारी दुसरी कोणीतरी' अशी मनाची समजूत घालून मी बसमध्ये चढलो. बस सुरू झाली आणि बसच्या वेगाने मला माझे मन भूतकाळात घेऊन गेले.

प्राजक्ता प्रभाकर परांजपे. मी इयत्ता 8 वीत असताना माझ्या वर्गात आलेली ती नवी मुलगी. साडेपाच फूट ऊंची, घारे डोळे, गोरा रंग आणि हसरा चेहरा त्यामुळे शाळेच्या साध्या गणवेशात आणि दोन वेण्यात देखील ती चारचौघीत उठून दिसायची. नवीन मुलाने/मुलीने सर्व मुलांसमोर उभे राहून स्वत:चा परिचय करून देण्याच्या कार्यक्रमात समजले की गेल्या 5 वर्षात तिने 3 शाळा बदलल्या आहेत. तिचे वडील IAS ऑफिसर असल्याने त्यांच्या सतत बदल्या होत असतात. त्यामुळे तिचा जास्त मित्रपरिवार नव्हता. पण ती न लाजता आपण या शाळेत सुरवातीपासून आहोत आणि ही बाकीची मुले नव्याने ॲडमिशन घेऊन आली आहेत अशा थाटात सर्वांची ओळख करून घ्यायची. अभ्यासात देखील हुशार. तिच्याशी आपली फक्त ओळख नव्हे

तर 'मैत्री' व्हावी अशी इच्छा आमच्या वर्गातील प्रत्येक मुलाची होती. पण स्वत:हून जाऊन बोलण्याचे कोणामध्ये धाडस नव्हते आणि ती आपणहून आपल्याशी बोलेल आणि मैत्री करेल याची शक्यता नव्हती. त्यामुळे मी देखील ओळखीचा पुढचा टप्पा गाठू शकलो नव्हतो. पण तरीही तिला पहिले की माझ्या मनातला शाहरुख खान जागा होऊन Violin वाजवत 'तुझे देखा तो ये जाना सनम' हे गाणं गाऊ लागायचा.

आणि माझे नशीब बदलून टाकणारा दिवस एकदाचा उजाडला. पी.टी.चा तास चालू होता. सगळी मुलं मैदानात खेळायला गेली होती. मी पाय दुखत असल्याने आणि प्राजक्ता त्या वर्षाच्या 'गणित प्राविण्य' या आंतर शालेय स्पर्धेची तयारी करत असल्याने वर्गात फक्त आम्ही दोघेच थांबलो होतो. गेली 4 वर्षे मी त्या 'गणित प्राविण्य' स्पर्धेत प्रथम परितोषिक मिळवत होतो, पण या वर्षी काही कारणास्तव मी त्या स्पर्धेत भाग घेऊ शकत नव्हतो. प्राजक्ता एकाग्रतेने गणिते सोडवत होती आणि मी तेवढ्याच एकाग्रतेने वाचनाचे नाटक करत लपत-छपत नजरेच्या कोपऱ्यातून तिच्याकडे पाहत होतो. तिला कदाचित एखादं गणित समजत नव्हते. तिने आजू-बाजूला पहिले आणि मी पटकन पुस्तकात डोके खुपसले. कदाचित तिला माझ्या गणित प्रविण्याबद्दल कोणाकडून तरी समजले असावे.

ती जागेवरून उठली आणि माझ्या बाकावर माझ्या शेजारी येऊन बसली. एवढ्या दिवसांची इच्छा पूर्ण झाल्याबद्दल मी त्या परमेश्वराचे मनोमन आभार मानले. तिने तिच्या मधाळ आवाजात मला विचारले, 'सुधाकर, मला हे गणित कसे सोडवायचे ते समजावून सांगशील का? प्लीज.'

तिचे ते माझ्याशी बोललेले पहिले वाक्य आजही माझ्या कानात रुंजी घालते. एखाद्या गाण्यासारखे. अगदी व्हायलिन बासरी आणि जलतरंगासह. आणि तो सुईच्या टोकासारखा 'प्लीज' आजही मला घायाळ करतो.

मी तिला ते गणित कसे सोडावयाचे ते समजावले. पी.टी.चा तास संपायला अजून 20 मिनिटे बाकी होती. तेवढा वेळ का होईना ती माझ्यासोबत बसावी यासाठी मी तिला माझ्या 4 वर्षांच्या अनुभवावरून त्या गणित प्राविण्य स्पर्धेसाठी कशी तयारी करायची, कोणती पुस्तके वाचायची, कठीण गणिते सोडवायच्या काही सोप्या पद्धती ईत्यादी समजावू लागलो आणि ती

देखील लता दीदी, किशोरदा किंवा मोहम्मद रफी साहेबांचे गाणे ऐकावे अशा तन्मयतेने माझे बोलणे ऐकत होती.

तास संपल्याची घंटा वाजली. तिने मला 'थँक यू' म्हणत हस्तांदोलनासाठी तिचा हात पुढे केला. मी 'काय करावे?' या विचाराने क्षणभर गोंधळून गेलो. पण पुढे कधी संधी मिळेल की नाही याची शाश्वती नसल्याने, पटकन तिचा हात पकडला आणि काही काळ तसाच दाबून ठेवला.

तिच्या हाताचा स्पर्श झालेला माझा तळहात मी दिवसभर पाहत होतो. शक्य असतं तर तो हात मी तसाच एखाद्या कवितेच्या पुस्तकात पिंपळपानासारखा जपून ठेवला असता. रात्री जेवतानाही तो धुण्याचं माझ्या जिवावर आलं होतं. अजूनही त्या हाताला एखाद्या अत्तरासारखा सुगंध येत होता. आणि साबण लावून तो काढून टाकायचं जिवावर आलं होतं.

पण एकंदर त्या दिवसापासून माझे नशीब बदलले होते. माझ्या सल्ल्यामुळे ती त्या 'गणित प्राविण्य' स्पर्धेत पहिली आली आणि तिने सर्व वर्गासामोर माझे आभार मानले. त्यामुळे वर्गात माझा रुबाब फारच वाढला. ती सारखी माझ्याशी बोलायला यायची. माझे मित्र माझ्यावर जळायचे, पण मी मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचो.

असेच चार-पाच महीने गेले. ती सतत अभ्यासात माझी मदत मागायची. तिच्या वागण्या-बोलण्यातून मला सतत वाटायचे, की तिला तिच्या वयापेक्षा जास्त समज आहे. पण तरीही आमची मैत्री वाढत होती. मला एकदा तरी तिच्या घरी जायची फार इच्छा होती. पण धाडस होत नव्हते. एके दिवशी तो योगही जुळून आला. त्या दिवशी शाळा सुटल्यावर ती मला भेटून म्हणाली, 'उद्या माझ्या घरी पार्टी आहे. तू नक्की ये.' कारण होतं तिचा वाढदिवस. तसही दुसऱ्या दिवशी सगळ्या वर्गाने टाळ्या वाजवून आणि 'Happy Birthday to you' च गाणं म्हटल्यावर तिने वर्गासमोर, 'आज माझ्याघरी वाढदिवसाची पार्टी आहे. तेव्हा जमल्यास सर्वांनी या' असं म्हणाली होती, पण मला मात्र एकट्याला 'नक्की ये' असं खासगी आणि आग्रहाचे निमंत्रण दिल्याने मी जरासा हवेतच उडत होतो.

त्या दिवशी संध्याकाळी मी माझे एकमेव असे ठेवणीतले कपडे घातले. तिला वाढदिवसाचे गिफ्ट म्हणून साठवलेल्या पैशातून एक 'पारकर'चं महागातलं पेन खरेदी करून ते

चंदेरी वेष्टनात गुंडाळलं आणि त्यावर ‘Best Wishes from Sudhakar’ असा कागद चिकटवला. संध्याकाळी 7.00 वाजता तिच्या घरी पोहोचलो. तिचा तो टेरेस फ्लॅट बंगल्यापेक्षा कमी नव्हता. आतला तो थाटमाट पाहून मी क्षणभर दारातच थबकलो. माझ्यासारख्या 50 पैशांची ‘alpenliebe’ची चॉकलेटं वाटून आणि 10 रूपयांचा केक दहा मित्रात वाटून वाढदिवस साजरा करणाऱ्या मुलाला तो तीन थरांच्या केक, ती सजावट, उच्च प्रतीच्या पदार्थांची रेलचेल असलं वातावरण म्हणजे स्वर्गात डायरेक्ट एंट्री मिळण्यासारखं होतं.

एवढ्यात प्राजक्ता आपणहून पुढे आली. तिच्या गोऱ्या नितळ कांतीवर तिने घातलेला तो गुलाबी आणि लालमिश्रित रंगाचा फ्रॉक आणि मोकळया सोडलेल्या केसांमुळे ती जणू स्वर्गातील अप्सराच वाटत होती. मी तिला दारातचं वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि भेटवस्तू दिली. तिनं गोड हसून मला ‘थॅंक यू’ म्हटलं आणि माझ्या हाताला धरून मला तिच्या आई-वडिलांकडे घेऊन गेली. तिने तिच्या आई-वडिलांना माझी ओळख आणि तिच्या गणित प्राविण्य स्पर्धेच्या विजयातील माझ्या योगदानाबाबत संगितले. आता ते ही माझं तोंडभरून कौतुक करतील या विचाराने मी आनंदित झालो. पण ते ‘वाह’ ‘छान’ ‘अभिनंदन’ असे कौतुकाचे दोन चार शब्द बोलून आपआपल्या गप्पांमध्ये मग्न झाले. मी जरासा खट्टू झालो पण तेव्हाच प्राजक्ता मला म्हणाली, ‘चल मी तुला घर दाखवते’ आणि मी आनंदाने तिच्यासोबत निघालो. पण ते सुख माझ्या नशिबात नव्हते. कारण तेव्हाच केक कापण्याची वेळ झाली होती. सर्वजण प्राजक्ताला बोलावू लागल्याने तिला नाईलाजाने जावे लागले. पण त्यात आनंदाची एक गोष्ट होती. कारण जाता-जाता ती मला म्हणाली, ‘पार्टी संपल्यावर नक्की थांब’. दुसऱ्या दिवशी रविवार असल्याने आणि घरी सांगून आलो असल्याने मला थांबायला काहीच हरकत नव्हती.

ती केकपाशी आली आणि सर्वजण तिच्याभोवती गोळा झाले. माझ्या ओळखीचे तेथे कोणीच नसल्याने मी सर्वांपासून जरासा लांबच उभा राहिलो होतो. केक कापला आणि Music System वर ‘Happy Birthday to you’चं गाणं लावलं गेलं. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. ती हसऱ्या चेहेऱ्याने सर्वांच्या शुभेच्छांचा स्वीकार करत होती. पण तिची नजर मात्र कोणालातरी शोधत होती. क्षणभर मला उगीचच वाटले की ती मलाच शोधते आहे. पण मी लांबच बसून शांतपणे तिच्या गोड हसऱ्या चहऱ्याकडे पाहत होतो.

जवळपास दोन तासांनी पार्टी संपली आणि हळू हळू गर्दी कमी झाली. आता घरात प्राजक्ता, तिचे आई-वडील, नोकर-चाकर आणि तिच्या आग्रहाखातर थांबलेला मी एवढेच जण होतो. प्राजक्ताचे आई-वडील त्यांच्या खोलीत निघून गेले आणि नोकर-चाकर घराची साफसफाई करू लागले. मला अजूनपर्यंत थांबलेला पाहून प्राजक्ताला आनंद झाला. ती एका डिशमध्ये उरलेल्या केकचा एक मोठसा तुकडा आणि दुसऱ्या डिशमध्ये वेफर्स घेऊन माझ्याकडे आली आणि मला म्हणाली, 'दोन सरबतची ग्लासं घेऊन गच्चीवर ये'.

मी एका संमोहितासारखा सरबतची दोन ग्लासं घेऊन तिच्या मागून जाऊ लागलो.

जिना चढताना एका खोलीतून मला प्राजक्ताच्या आई-वडिलांच्या भांडणाचा आवाज ऐकू आला. पण मी मात्र 'ये तो हर घर की बात है' असा समज करून वर गच्चीवर गेलो. गच्चीवर एक सोफा आणि एक टेबल ठेवले होते. त्या टेबलावर पदार्थ ठेवून आम्ही सोफ्यावर जवळ-जवळ बसलो.

त्या गच्चीवरचा तिच्या सहवासातला तो एक तास माझ्या आयुष्यातील सोनेरी क्षणांपैकी होता. त्या मनमोहक वातावरणातील तो एकांत, ती शांतता, हवेतील गारवा, आभाळातील चंद्र-चांदण्या आणि सोबत प्राजक्तासारखी स्वप्नसुंदरी. यामुळे माझी अवस्था शाहरुख खानच्या 'ओम शांति ओम' चित्रपटातील 'I feel like the king of the World' या dialogue सारखी झाली होती. तिला एकांतात केक भरवण्याचे सुख मी अनुभवले. तिने मला 'कशी वाटली पार्टी?' यासारखे पारंपारिक प्रश्न विचारले आणि मी देखील 'हो मस्त होती', 'खूप मजा आली' यासारखी पारंपरिक आणि सकारात्मक उत्तरे दिली. त्यानंतर मात्र ती अगदी गप्प झाली आणि शांतपणे एकटक चंद्राकडे बघत बसली.

बराच वेळ झाला तरी ती बोलायलाच तयार होत नव्हती. आता त्या हव्या-हव्याशा वाटणाऱ्या शांततेचे रूपांतर स्मशान शांततेत झालं. मी मात्र चुळबुळ करत, वेफर्स खात आणि सरबतचा एक-एक घोट घेत तिच्या बोलण्याची वाट बघत होतो. वेफ़र खाताना होणाऱ्या कुर्र आवाजानेही मला काहीतरी गुन्हा घडल्याप्रमाणे वाटावे इतकी शांतता होती.

ती मात्र एखाद्या पुतळ्यासारखी स्तब्धपणे चंद्राकडे पाहत बसली होती आणि माझी काही बोलण्याची हिम्मत होत नव्हती. थोड्यावेळाने मी देखील तिच्यासारखा चंद्राकडे एकटक

पाहण्याच्या प्रयत्न करू लागलो आणि चमत्कार झाला. मला चंद्रातही प्राजक्ताचा चेहेरा दिसू लागला. ‘तिचेही असेच काहीसे झाले असेल’ या विचाराने मी हुरळून गेलो आणि मी देखील चंद्राकडे एकटक पाहत बसलो.

काही वेळाने मला जाणवले की ती माझ्या हाताला विळखा घालून मला अगदी चिटकुन बसली आहे आणि डोके माझ्या खांद्यावर ठेऊन शांतपणे झोपली आहे. तिच्या शरीराचा स्पर्श मला सुखावत होता. मी देखील न हलता मनोमन तो आनंद लुटत शांतपणे बसलो. आता हिला सकाळपर्यंत जाग येऊच नये असे मला वाटत होते. पण कदाचित माझे नशिबच फुटके होते. थोड्याच वेळात कोणीतरी गच्चीवर येत असल्याचे जाणवले आणि मी तिला नाईलाजाने उठवले. एक नोकर प्राजक्ताच्या आई-वडिलांचा ‘आम्ही काही कामासाठी बाहेर जात आहोत. यायला उशीर होईल. तू जेवून झोप’ हा निरोप देण्यासाठी आला होता. मी घड्याळ पहिले तर साडेनऊ वाजले होते. मी नाखुषीने म्हणालो, ‘चल, मी पण निघतो’ तिनं हात पकडून मला थांबवलं आणि ‘जेवूनच जा ना. प्लीज.’ अशी विनंती केली.

मला खरंतर थांबायचं आयतंच निमित्त मिळाल्याने मी मनातल्या मनात उड्या मारू लागलो. पण मला तिच्या बोलण्यातून जाणवलं की तिचा नेहमीचा गोड आवाज रडवेला झाला होता आणि तिच्या डोळ्यात पाणी तरारलं होतं. तिची अवस्था पाहून मला ‘नाही’ म्हणणं जीवावरच आलं असतं म्हणा. मी प्राजक्ताच्या घरूनच माझ्या घरी फोन करून ‘मी जेवणासाठी येत नाही आहे’ असे सांगितले.

आम्ही जेवायला बसलो. जेवताना देखील प्राजक्ता अगदी गप्प. तोंडातून एक चकार शब्द न काढता अगदी शांतपणे जेवत होती. मला कारण समजले. आपल्या वाढदिवसादिवशी आपले आई-वडील भांडतात आणि सोबत जेवायलाही न बसता कामासाठी बाहेर जातात याचे दु:ख तिला झाले असणार. मला तिचा हात धरून तिला धीर द्यायची खूप इच्छा होत होती, पण शेजारी तिचे नोकर आमच्या सरबराईला उभे असल्याने मला तसे करता येत नव्हते. एरवी मोकळेपणाने बडबडणारी प्राजक्ता तिच्या वाढदिवसाच्या दिवशी अशी गप्प-गप्प असल्याने समोर पंचपक्वांनांनी भरलेलं ताट असूनही माझी जेवणाची इच्छाच निघून गेली होती. जेवायचे म्हणून मी थोडेसे जेवलो.

जेवण झाल्यावर इच्छा नसूनही केवळ नाईलाजास्तव प्राजक्ताचा निरोप घेऊन मी परत जायला निघालो. घरातून बाहेर पडल्यावर मागे वळून पहिले तर ती खिडकीत उभी होती. मी हात उंचावून तिला 'टाटा' केला तिनेही मला हात उंचावून 'टाटा' केला. मी दर दहा पावले चालून झाल्यावर मागे वळून पहायचो. ती खिडकीतच उभे असायची. मी हात उंचवून 'टाटा' केल्यावर ती देखील हात उंचावून 'टाटा' करायची. मी रिक्षा थांबवली. रिक्षात बसताना परत एकदा तिच्याकडे पाहून 'टाटा' केले. तिनेही 'टाटा' केले. मी रिक्षात बसलो. रिक्षात सुरू झाली आणि का कोण जाणे माझ्या डोळयात टचकन पाणी आलं.

त्या रात्री मला झोपच आली नाही. रात्रभर माझ्या डोळयांसमोर तो वाढदिवसाचा दिमाखदार सोहळा आणि त्या सोहळयात गप्प-गप्पशी आणि पाणावलेल्या डोळयांची प्राजक्ता दिसत होती. दुसऱ्या दिवशी देखील मी घुम्यासारखा वागत होतो. घरच्यांच्या प्रश्नांना उडवा-उडवीची उत्तरं देत होतो. मला सारखे प्राजक्ताला जाऊन भेटावेसे वाटत होते. पण ते शक्य नव्हते. शेवटी उद्या शाळेत भेटल्यावर तिच्यापाशी आपले मन मोकळे करायचे असे मी ठरवले.

पण दुसऱ्या दिवशी ती शाळेत आलीच नाही. त्यामुळे मी अजूनच अस्वस्थ झालो. 'काय झालं असेल तिला?', 'आजारी तर नसेल ना?', 'माझ्यावर रागावली तर नसेल ना?', 'तिच्या आई-वडिलांचा माझ्याबद्दल काही गैरसमज तर झाला नसेल ना?' अशा असंख्य प्रश्नांनी मला भंडावून सोडले. तो संपूर्ण दिवस शाळेतदेखील मी शांतच होतो. कोणाशीच बोलावेसे वाटेना. आता काही झालं तरी शाळा सुटल्यावर तिच्या घरी जायचं असं मी ठरवलं. पण मला जायची गरजच पडली नाही.

शाळा सुटल्यावर गेटच्या बाहेर आलो, तेवढ्यात मला कोणीतरी हाक मारली. मी त्या आवाजाच्या दिशेने पाहिलं तर प्राजक्ताच्या घरातील एक नोकर –तुकाराम- मला बोलावत होता. मी त्याच्यापाशी गेलो. त्याने माझ्या हातात एक चिठ्ठी दिली आणि मला म्हणाला, "प्राजक्ताच्या वडिलांची दिल्लीला बदली झाली आहे. ती सगळी मंडळी कालच दिल्लीला निघून गेली. जाताना प्राजक्ताने मला ही चिठ्ठी तुला द्यायला सांगितले. पण तुझ्या घरचा पत्ता माहीत नसल्याने आज इथे आलो."

त्याचे बोलणे ऐकून माझ्या पायाखालची जमीनचं सरकली. 'प्राजक्ता आता आपल्याला भेटणार नाही' हा विचारच मला सहन होईना. मी धावत धावत घरी आलो. घरी कोणीच नव्हते. मी दरवाजे आणि खिडक्या बंद केल्या आणि टेबललॅम्पच्या प्रकाशात तिची चिठ्ठी उघडली. त्यात तिने स्वत:च्या मोत्यासारख्या सुंदर हस्ताक्षरात खलील मजकूर लिहिला होता,

*प्रिय सुधाकर,*

*माझ्या कालच्या वागण्याचं तुला आश्चर्य वाटलं असेल याची मला खात्री आहे. मी आजवर 3 शाळा बदलल्या. त्यामुळे माझे फारसे मित्र-मैत्रिणी झाले नाहीत असे मी म्हणते. पण खरं कारण वेगळं आहे. आजवर मला जेव्हढी मुलं भेटली ती सर्व कपटी मनाची होती. एखाद्याला मदत करताना काहीतरी स्वार्थ बाळगायची. साफ मनाने माझ्याशी मैत्री न करता मित्रांमध्ये आपला रुबाब वाढवा यासाठी मैत्री करायचा प्रयत्न करायचे. त्यामुळे मी त्यांच्याशी मैत्री करणे टाळायचे. तू मात्र पहिला असा मुलगा आहेस ज्याने अगदी निस्वार्थीपणे आणि निरपेक्ष मनाने माझी मदत केलीस. तुझ्या साफ मनामुळे मला तुझा सहवास हवा हवासा वाटायचा. तुझ्याशी सतत बोलता यावं म्हणून सुटत असलेले प्रश्न तुझ्यापाशी सोडवायला घेऊन यायचे.*

*आज मला तुला एक गोष्ट सांगायची आहे.*

*मी अनाथ आहे.*

*सात वर्षांपूर्वी एका अपघातात माझे आई-वडील वारले. त्यानंतर मी अनाथाश्रमात राहिले. पाच वर्षांपूर्वी मला प्रभाकर विनायक परांजपे आणि प्रमिला प्रभाकर परांजपे या निपुत्रिक जोडप्याने दत्तक घेतले. पण त्यांनी कधीही माझ्यावर माया केली नाही, तर माया केल्याचा देखावा मात्र करत राहिले. म्हणूनच मला त्यांना 'आई-बाबा' म्हणावेसे वाटत नाही. घरात कायम भांडणाचे वातावरण असते. मला या घरात कधीच प्रेम मिळत नाही. त्यामुळे घरात कायम मी एकटीच असते.*

*लोकं मला मोकळेपणाने बोलणारी, लोकांच्यात मिसळणारी आणि वयापेक्षा अधिक समजूतदार मुलगी म्हणून माझं कौतुक करतात. पण तो माझा गुण नाही तर नाईलाज आहे.*

*वाढदिवसाच्या पार्टीमधे प्रभाकर परांजपेंनी त्यांच्या एका मित्राला उद्या आम्ही कायमचचे दिल्लीला जाणार आहोत असे सांगत असताना ऐकले. तेव्हापासून माझे मन अस्थिर होते. रात्री गच्चीवर मला तुझ्यापाशी माझं मन मोकळं करायचं होतं. पण आता हा तुझा सहवास पुन्हा मिळेल की नाही ही भीती होती. म्हणून त्या सहवासाचा पुरेपूर उपभोग घेण्याच्या नादात बोलायची संधीच मिळाली नाही.*

*आता उद्यापासून आपण भेटणार नाही. भविष्यात भेटू याची खात्री नाही. पण आपण एकमेकांच्या मनात कायमचे राहू याचा आनंद आहे.*

*तुझी*

*प्राजक्ता*

ते पत्र वाचून मी ढसा ढसा रडू लागलो. हे सगळं माझ्याच बाबतीत का घडावं? हेच मला समजेना. प्राजक्ताच्या विचाराने मला आता वेड लागेल असे वाटत होते. पण म्हणतात ना, 'काळासारखे औषध नाही'. कालांतराने मी ही सर्व घटना हळू हळू विसरू लागलो. प्राजक्ताशिवाय जगण्याचा प्रयत्न करू लागलो. पण तिचं ते पत्र मात्र मी जिवापाड जपून ठेवलं आणि कोणाही समोर त्याचा उल्लेख केला नाही.

एखादया हसऱ्या चेहेऱ्यामागे मनात खोलवर किती भयंकर दु:ख लपलेलं असतं याचे 'प्राजक्ता प्रभाकर परांजपे' नामक मुलगी हे एक जीवंत उदाहरण होते.

बसच्या ड्रायव्हरने अचानक ब्रेक मारल्यामुळे माझं डोकं पुढच्या सीटवर आपटले. डोके चोळत स्वप्नातून वास्तवत आलो. आपले एखादे आवडीचे माणूस आपल्याला सोडून गेले की सगळीकडे आपल्याला त्याच माणसाचा भास होतो हे मी ऐकून होतो. पण आज तब्बल 8 वर्षांनी मला ती एकच मुलगी प्राजक्तासारखी का दिसावी? हेच मला समजेना. एकदा माझ्या मनात विचार येऊन गेला ती खरचं प्राजक्ता तर नसेल? पण हे शक्यच नव्हतं. ती सध्याशा पंजाबी पोषाखातली सावळया वर्णाची, केसांची साधिशी वेणी घातलेली आणि हातात घरोघरी वस्तु विकणाऱ्या विक्रेत्यासारखी भलीमोठी पिशवी घेतलेली मुलगी त्या बसच्या रांगेत उभी होती. ती प्राजक्ता नसणारचं याची मला खात्री झाली. 'आपला काहीतरी गैरसमज झाला असेल' अशी मी मनाची समजूत करून घेतली आणि तो विचार डोक्यातून काढून टाकला.

पण का कोण जाणे तो विचार 'Boomerang' सारखा फिरून सतत माझ्या डोक्यात येत होता. ती जर प्राजक्ता नसेल तर खरी प्राजक्ता कुठे असेल? कशी असेल? काय करत असेल? तिनं लग्न केलं असेल का? जर आता 8 वर्षानी भेटली तर मला ओळखेल का? ई. विचारांनी माझे डोके पुन्हा भंडावून सोडले. आता या सर्व प्रश्नांची उत्तरं शोधल्याशिवाय आपल्याला शांतता मिळणार नाही हे मला पक्कं माहीत होतं. पण ती शोधायची कशी? हा नवा प्रश्न तयार झाला. पण या वेळी मात्र माझं नशीब चांगलं होतं.

दोन दिवसांनंतरची गोष्ट. ऑफिस सुटल्यावर भूक लागल्यामुळे जवळच्या हॉटेलात गेलो. तेथे रिकामी खुर्ची शोधत असताना एका टेबलावर माझी नजर गेली. त्यावर एकच माणूस बसला होता आणि तो तुकाराम होता. ज्याने त्या दिवशी शाळेत येऊन मला प्राजक्ताचं पत्र दिलं होतं तो. मी तडक त्याच्या टेबलापाशी गेलो आणि त्याला विचारलं, "आपण तुकाराम आहात का? 8 वर्षांपूर्वी प्रभाकर परांजपे यांच्याकडे काम करायचात?" तो 'आ' वासून माझ्याकडे पाहत राहिला. त्याने विचारले, "आपण कोण आणि मला कसे ओळखता?" मी त्याला माझे नाव आणि ओळख सांगितली. तेव्हा त्याने हसून माझ्याशी हस्तांदोलन केले आणि मला बसण्याची विनंती केली.

थोडावेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मी त्याला सकाळचा बसस्टॉपवरचा प्रसंग सांगितला आणि प्राजक्ताबद्दल विचारले. तेव्हा मात्र त्याच्या चेहेऱ्यावरील आनंद क्षणात नाहीसा होऊन दु:खाची छटा दिसू लागली आणि त्यानंतर त्याने मला प्राजक्ताची जी कहाणी सांगितली त्यामुळे माझे काळीज चिरले गेले.

प्रमिला ही प्रभाकर परांजपेंची दुसरी पत्नी होती. त्यांची पहिली पत्नी कॅन्सरच्या आजाराने वारली होती. तिच्यापासून परांजपेना मुलबाळ झालं नव्हते. म्हणून त्यांनी प्रमिलाशी लग्न केले. पण त्यांच्या प्रयत्नांना यश येत नव्हतं. डॉक्टरांकडून समजले की प्रभाकर परांजपेंमध्येच दोष आहे. शेवटी त्यांनी प्राजक्ताला दत्तक घेतलं. पण प्रमिलाला याचा राग होता. प्रमिला बिनधास्त स्वभावाची बाई होती. आई-वडिलांनी ऐन तारुण्यात लग्न केलं आणि दोन महिन्यात देवाघरी गेले. नवऱ्याकडून काही सुख मिळत नसल्याचे पाहून तिने तिला हवं असलेलं सुख बाहेर शोधायला सुरवात केली. रोज घरी उशिरा यायची आणि त्यावरून तिचे आणि प्रभाकर परांजपेंचे सारखे भांडण व्हायचे. प्रभाकर परांजपेना प्रमिलाचा स्वभाव माहीत होता आणि त्यांनी त्यांच्या मृत्युपत्रात सगळी संपत्ती प्राजक्ताच्या नावावर करायचा निश्चय केला. तेव्हापासून प्रमिला सूडबुद्धीने पेटून उठली आणि सगळी संपत्ती आपल्याला कशी मिळेल? याचा विचार करू लागली.

चार वर्षांपूर्वी, म्हणजेच प्राजक्ता 20 वर्षांची असताना प्रभाकर परांजपेंच्या गाडीला अपघात झाला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. प्रमिलाला प्राजक्ताला आपल्या मार्गातून बाजूला करायचे होते. तिने प्राजक्ताला जीवे मारण्याची धमकी देऊन घाबरवले आणि तिच्याकडून कोऱ्या कागदावर तिच्या सह्या घेतल्या. त्यावर आत्महत्येचा मजकूर लिहून कागदोपत्री प्राजक्ताला मारून टाकले. प्रमिलाच्या वकिलाने कोर्टात प्रभाकर परांजपेंच्या मुलीने वडिलांच्या निधनानंतर दु:खाच्या आहारी जाऊन आत्महत्या केली आणि त्यांचे मृत्यूपत्र आणि इतर कोणी नातेवाईक नसल्याने त्यांची सगळी संपत्ती त्यांच्या विधवा पत्नीस -श्रीमती. प्रमिला प्रभाकर परांजपे- यांना मिळावी असा युक्तिवाद करून सर्व संपत्ती प्रमिलाला मिळवून दिली. प्रमिलाने प्राजक्ताला थोडेसे पैसे देऊन घरातून हाकलून दिले आणि बाकी सर्व संपत्ती विकून आपल्या मित्रासोबत परदेशात निघून गेली.

तुकारामच्या डोळयात पाणी आले आणि तो रडू लागला. मी त्याला पाणी दिले आणि शांत केले. शांत झाल्यावर मी त्याला विचारले, “पण आता प्राजक्ता कुठे आहे?”

तेव्हा तुकाराम म्हणाला, “मला ही हकीकत त्यांच्या दिल्लीच्या एका नोकराकडून समजली. प्रमिलाने घरातून हाकलून दिल्यावर प्राजक्ताला आता या जगात कोणीच नव्हते. त्यानंतर तिचे काय झाले? ती कुठे गेली? हे मात्र मला माहीत नाही. कदाचित तुला सकाळी दिसलेली मुलगी खरी प्राजक्तादेखील असू शकते.”

तुकारामच्या बोलण्याने माझ्या मनातील शंकेचे खात्रीत रूपांतर होऊ लागले. प्राजक्ताच्या गोष्टीवरून, घरातून हाकलून दिल्यावर प्राजक्ताकडे पैसे नसणार आणि त्यामुळे तिची अशी हलाखीची परिस्थिती झाली असणार. म्हणूनच स्वर्गातल्या अप्सरेसारखी दिसणारी प्राजक्ता आज एका लंकेच्या पार्वतीसारखी दिसत होती. आता प्राजक्ता मुंबईत कधी आली? आणि सध्या कुठे असते? याचा उलगडा करण्यासाठी तिला प्रत्यक्षात भेटणे गरजेचे होते. पण तिचा पत्ता काय? हेच मला समजत नव्हते आणि कोणालाही ठाऊक नव्हते.

ती देखील माझ्या शोधात असेल तर ती माझ्या जुन्या घरी नक्कीच गेली असणार. लहानपणी मला तिला त्या माझ्या छोट्या घरात बोलवण्याची कधी हिम्मतच झाली नाही. पण बोलण्याच्या ओघात कधीतरी मी कुठे राहतो हे तिला सांगितलं असेल आणि ती माझी चौकशी करायला त्या ठिकाणी गेली असेल असा मला संशय आला होता. म्हणून मी त्या चाळीत जाऊन माझी चौकशी करत कोणी मुलगी आली होती का? असा प्रश्न माझ्या पूर्वीच्या शेजाऱ्यांना विचारला. पण तेथेही माझ्या पदरी निराशाच पडली. ती पूर्वी मुंबईत असताना जिथं राहायची तिथं जाऊन चौकशी केली. पण त्या लोकांनाही काही माहीत नव्हते. त्या दिवशी बसस्टॉपवर तिचा फोटो घ्यायला हवा होता. जेणेकरून तिला शोधणे सोपे झाले असते असा विचार सारखा माझ्या मनात येत होता.

मग मला अचानक आठवले की आम्ही 8 वीत असताना आमच्या संगणकाच्या तासाला आमच्या बाईंनी आम्हाला प्रत्येकाला स्वत:चा फेसबूक अकाऊंट बनवायला संगितले होते. सर्व मुलांनी आणि मुलींनी अकाऊंट बनवून, एकमेकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून प्रत्येकाने त्या ॲक्सेप्ट केल्या होत्या. त्यामुळे फेसबुकवरून मला तिचा फोटो मिळू शकतो अशी आशा माझ्या मनात पल्लवीत झाली. मी त्यात जास्ती रमणारा नसल्याने माझ्या फेसबुक अकाऊंटचा ID आणि

पासवर्ड विसरूनही गेलो होतो. मग मी एका 8 वीतील वर्गमित्राच्या घरी गेलो आणि त्याचा फेसबुक अकाऊंट चेक केला. त्याच्या फ्रेंड लिस्ट मध्ये प्राजक्ता प्रभाकर परांजपे नावाची मुलगी होती. ही तीच प्राजक्ता आहे हे शाळेचे नाव आणि तिच्या फ्रेंड लिस्ट वरून समजले. पण तिने डीपी आणि कोणताही फोटो अपलोड केला नव्हता. त्यामुळे परत पदरी निराशा पडणार असे वाटले होते. पण या वेळी माझा मित्र देवसारखा धावून आला. त्याने थोडावेळ कम्प्युटर मध्ये डोके खुपसले आणि मला प्राजक्ताचा एक ग्रुप फोटो काढून दिला. तिच्या कोणत्यातरी मैत्रिणीने तो एका कार्यक्रमातला फोटो तिला Tag केला होता. तिचा चेहेरा पाहून आज बसस्टॉपवर दिसलेली प्राजक्ताच होती याची खात्री पटली. मी त्या ग्रुप फोटोमधून तिचा फोटो क्रॉप करून घेतला आणि माझ्या मुंबईतील मित्रमंडळींच्या whatsapp वर पाठवून खाली एक मजकूर लिहिला,

'या मुलीचे नाव मी आपल्याला सांगू शकत नाही. मी हिला एका महत्वाच्या आणि खासगी कारणासाठी शोधतो आहे. ती सावळ्या रंगाची आणि पंजाबी ड्रेस, एकेरी वेणी अशा पोषाखात घरोघरी जाऊन वस्तु विकते, असा माझा अंदाज आहे. कृपया हा फोटो जास्त viral करू नका आणि हि मुलगी तुम्हाला कोठे दिसल्यास कळवा.'

तो फोटो प्राजक्ताचाच आहे हे माझ्या शाळेतील मित्रांनी ताबडतोब ओळखले. माझी चेष्ट-मस्करीही सुरू केली. पण तिला शोधण्यासाठी मात्र कोणीच मदत केली नाही. शेवटी कोणावरही अवलंबून न राहता आपणच घराबाहेर पडून तिला शोधावे असा मी विचार केला.

पण खरचं देव या वेळी माझ्यासोबत होता. दोन दिवसांनंतर संध्याकाळी मला एका अंधेरीत राहणाऱ्या मित्राचा फोन आला. त्याने संगितले, 'मी हा फोटो आईला दाखवला. तेव्हा ती म्हणाली, "अशी एक मुलगी परवाचं आपल्या घरी पापड लोणची विकायला येऊन गेली आणि मी तिच्याकरून वस्तु खरेदीपण केल्या." मी तडक अंधेरीला त्या मित्राच्या घरी गेलो. ती लोणची पापडांची पाकिटे बघितली. त्यावर 'सुकन्या लोणची व पापड' असे नाव होते. त्यावर मागच्या बाजूला त्या कंपनीचा दूरध्वनी क्रमांक होता. मी त्या क्रमांकावर संपर्क करून त्या कंपांनीच्या ऑफिसचा पत्ता मिळवला. ते ऑफिस पार्ल्यात होते. दुसऱ्या दिवशी मी त्या ऑफिसात गेलो.

माझे नशीब एवढे बलवत्तर होते की तिथला मॅनेजर माझ्या ओळखीचा निघाला. मी त्याला सर्व परिस्थिति समजावून सांगितली आणि मदतीची विनंती केली. त्यानेही मैत्री निभावली. त्याने त्या कंपनीत विक्रेत्याचे काम करणाऱ्या सर्व मुलींचे रेकॉर्डस मला दाखवले. त्यातल्या एका फॉर्मवर सकाळी बसस्टॉपवर दिसलेल्या मुलीचा फोटो होता. त्या फॉर्मवर शिवानी रामचंद्र नाईक असे नाव होते. काही क्षण मी त्या फोटोकडे पाहत राहिलो आणि तो फोटो प्राजक्ताचाच आहे याची मला खात्री झाली. मग तिला नाव बादलायचे कारण काय? मी माझ्या मित्राला विचारले, “ही मुलगी इथे कशी आली?” तेव्हा तो म्हणाला, “सहा महिन्यांपूर्वी ही मुलगी इथे नोकरी मागण्यासाठी आली होती. ‘माझे आई-वडील एका अपघातात वारले’ असे तिने सांगितले. तिच्याकडे कोणतेही ओळखपत्र नव्हते. पण ती प्रामाणिक वाटली म्हणून आमच्या मालकांनी तिला कामावर ठेवले. खूप मेहनती आहे ही मुलगी. जास्तीत जास्त ठिकाणी फिरून सामान विकायची जिद्द आहे पोरीत. तिच्यामुळे आमच्या मालाचा खप देखील वाढला आहे. म्हणूनच मालक खूप खुश आहेत तिच्यावर.”

मला त्याच्या बोलण्याचे जराही नवल वाटले नाही, कारण प्राजक्ताची ती गोष्ट खोटी आहे हे मला माहीत होते. कधीतरी माझ्या घरचा दरवाजा ठोठवून माझी भेट होईल या आशेने ती जास्तीत जास्त ठिकाणी फिरत असणार याचीही मला खात्री झाली. पण तरीही प्राजक्ताने आपली ओळख का लपवली? याचे मात्र आश्चर्य होतेच. मी त्या रेकॉर्डवरचा पत्ता पहिला तो गोरेगांवातील झोपडपट्टीचा पत्ता होता. मी त्या मित्राचे आभार मानून परत घरी आलो.

म्हणजे गेले सहा महीने ही मुलगी माझ्याच भागात राहते आहे आणि त्याचा मला पत्ताच नाही. मी कितीतरी वेळा हिला पहिले असेल पण ओळखलेच नसेल. तिने मला कदाचित पहिले असेल. पण ओळखले असेल का? नसेल कदाचित. कारण जर ओळखले असते तर कदाचित मला भेटण्याचा प्रयत्न केला असता हे नक्की. पण तिला तसा प्रयत्न करावासा वाटलाच नसेल तर? कदाचित माझे तिच्यावरचे प्रेम एकतर्फीच असेल तर? पण असे असेल तर तिच्या त्या पत्राचा आणि ओळख बदलून राहण्याचा अर्थ तरी काय? अशा अनेक प्रश्नांनी माझे डोके पुन्हा एकदा भंडावून सोडले. आता या सगळ्याचा सोक्षमोक्ष तिला प्रत्यक्षात भेटल्याशिवाय लागणार नाही हे मला माहीत होते.

दुसऱ्या दिवशी मी माझ्या बुलेट गाडीवरून त्या झोपडपट्टीत गेलो. विचारपूस करून प्राजक्ताची खोली शोधून काढली. दरवाजा ठोठावला. दार उघडल्यावर समोर जुनी आणि मळकी अशी निळया रंगाची साडी नेसलेली, केसांचा अंबाडा बांधलेली आणि हातातील दोन हिरव्या बांगड्यांखेरीज अंगावर एकही आभूषण नसलेली ती मोलकरणीच्या वेषातील प्राजक्ता उभी होती. पण तिच्यात मला ती 12 वर्षांपूर्वीची प्राजक्ता दिसली. मी पुढे होऊन तिला मिठी मारली. तिनेही प्रतिकार न करता मला तिच्या मिठीत सामावून घेतले. काही क्षण आम्ही तसेच उभे होतो. मग ती भानावर आली आणि स्वत:ला माझ्या मिठीतून सोडवून घेतले. मला आत यायला सांगून दरवाजा बंद केला. मला एक हात मोडकी लाकडी खुर्ची बसायला दिली. खोलीची अवस्था तर बघवत नव्हती. उभे राहून हात वर केला तर हाताचा तळावा छताला लागेल एवढ्या उंचीची 10 बाय 10 ची खोली. पोपड उडालेल्या भिंती. जळून काळी पडलेली स्वयंपाकाची भांडी. पोचा पाडलेल्या दोन बादल्या, लोखंडी पलंग, पण त्यावर झोपायला/बसायला जागा नाही, कारण संपूर्ण पलंग कपड्यांनी आणि लोणची पापडांच्या पाकीटांनी भरलेला. घरात कपाट नावाची गोष्ट नव्हती.

खरं सांगायचं तर माझ्यासाठी ही परिस्थिती काही नवीन नव्हती. कारण मी देखील या परिस्थितीतून पूर्वी गेलो होतो. आता जरी मी आठराव्या मजल्यावरील आलीशान 3 BHK फ्लॅट मध्ये राहत असलो तरी पूर्वी मी देखील आईसोबत पोचा पाडलेल्या बादल्यांमधून रांगेत उभे राहून पाणी भरलेले होते. त्यामुळे तिने मला प्यायला दिलेले कूपनलिकेचे खारे पाणी देखील मी सहज प्यायलो. पण तिच्यासारख्या श्रीमंतीत वाढलेल्या मुलीने अशा वनवासात राहणे हे मात्र मला पचत नव्हते. मी विचारले, “कधी आलीस मुंबईत?” ती म्हणाली, “चार वर्षांपूर्वी.” एका प्लॅस्टिकच्या डब्यातून स्टेनलेस स्टीलच्या वाटीत शेव काढून मला खायला दिले आणि म्हणाली, “तू बस, पाण्याची वेळ झाली आहे.” आणि त्या पोचा पाडलेल्या दोन बदल्या घेऊन निघून गेली. मी निमूटपणे बसून राहिलो.

काही वेळाने शेजारच्या काकू चहा घेऊन आल्या. त्यांनी माझी विचारपूस आणि प्राजक्ताशी असलेल्या नात्याची चौकशी केली. मी त्यांना माझी माफक माहिती सांगून ‘आमची शाळेत असताना ओळख होती आणि नंतर तिनं शाळा बदलली’ अशी आमच्या नात्याची ओळख करून दिली. त्यांनी देखील मला प्राजक्ताचे तेच नाव आणि तीच कहाणी सांगितली जी माझ्या मित्राने (‘सुकन्या लोणची व पापडच्या’ मॅनेजरने) सांगितली होती. त्यामुळे ‘प्राजक्ता अशा

परिस्थितीत का राहते?’ यापेक्षा ‘ही ओळख का लपवतेय?’ हा प्रश्न अधिकच उफाळून आला. त्याचप्रमाणे दोघेही प्राजक्ताला गेल्या सहा महिन्यांपासून ओळखतात. तर मुंबईत आल्यावर मधली 3½ वर्षे प्राजक्ता कुठे होती? हा देखील एक अनुत्तरित प्रश्न होताच. पण या सर्व प्रश्नांची उत्तरं मला प्राजक्ताशिवाय कोणीच देऊ शकणारे नव्हते.

काकू निघून गेल्या. थोड्यावेळाने प्राजक्ता बादल्या घेऊन आली. मी उठलो आणि तिला म्हणालो, “लवकर तयार हो आणि त्या बाहेरच्या रस्त्यावर ये. मी वाट पाहतोय.” आणि तिच्या घरातून निघून गेलो. बाहेरच्या रस्त्यावर बुलेट पार्क करून तिची वाट पाहत बसलो. जवळपास 10 मिनिटांनी ती आली. जुना पण त्यातल्यात्यात बरा असा पिवळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस घातला होता. साधिशी वेणी, हातात दोन बांगड्या आणि पायात स्वस्तातली चप्पल असा तो बस स्टॉप सारखाच अवतार. फक्त या वेळी हातात मोठाली बॅग नव्हती तर खांद्यावर साधिशी पर्स लटकत होती. मी काही न बोलता किक मारून बुलेट सुरू केली आणि ती देखील काही न बोलता मागच्या सीट वर बसली. आमच्याकडे डोळे फाडून-फाडून पाहणाऱ्या लोकांकडे दुर्लक्ष करत मी त्या वस्तीतून बाहेर पडलो.

माझी बिल्डिंग त्या वस्तीपासून फक्त ½ तासाच्या अंतरावर होती. पण मी मुद्दामहून दूसरा आणि लांबचा रास्ता पकडला. जेणेकरून तिला माझ्याशी बोलायचं असेल तर बोलायला मिळेल असा माझा विचार होता. पण त्या दोन तासांच्या प्रवासात तिने तोंडातून एक चकार शब्दही काढला नाही.

माझ्या घरी पोहोचल्यावर जेव्हा मी माझ्या आई-बाबांच्या नावाची पाटी लावलेला दरवाजा उघडला तेव्हा ते आतले वातावरण पाहताना प्राजक्ताच्या डोळयातील चमक अवर्णनीय होती. लहानपणी ती तसल्या वातावरणात खेळली तरी गेली चार वर्षे तिने नरकयातना भोगल्या होत्या आणि असे ऐश्वर्य फक्त दरवाजा पलीकडूनच पहिले होते. आज चार वर्षांनी उंबरठा ओलांडून तिने तिच्या हक्काच्या स्वर्गात प्रवेश केला. आता हा संपूर्ण वेळ मी फक्त तिचाच आहे असे ठरवून मी माझा मोबाइल फोन स्विचऑफ केला, लॅंडलाइनचा रिसिव्हर काढून ठेवला, बेलचे बटन बंद केले आणि दरवाजा लॉक करून तिच्या चेहेऱ्याचे निरीक्षण करू लागलो.

ती घरातल्या प्रत्येक लहान-सहान गोष्टींना हात लावून पाहत होती. त्यातून मिळणारा आनंद तिच्या चेहेऱ्यावर मला स्पष्टपणे दिसत होता.

मी अगदी माझ्याही नकळत तिला म्हणालो, “मंदिरा एका महिन्यासाठी आई-बाबांसोबत माहेरी गेली आहे. नाहीतर ओळख करून दिली असती.”

मी असे बोलताच तिनं चमकून माझ्याकडे पहिलं आणि तेव्हाच तिचं लक्ष टेबलावर ठेवलेल्या आणि तिनं आतापर्यंत न पाहिलेल्या माझ्या आणि मंदिराच्या लग्नातल्या फोटोकडे गेलं. तेव्हा तिच्या चेहेऱ्यावरील आनंद झटक्यात कमी झाल्याचे मला जाणवले. पण त्याला आता काहीच इलाज नव्हता. सर्व प्रकारची बंधनं तोडून मनासारखं जगता येण्याचं सुख प्रत्येकाच्या नशिबात नसतं हेच खरं. त्या न्यायानुसार मी देखील घरच्यांच्या आग्रहाखातर लग्न केलं. माझी मंदिराकडून कोणतीही तक्रार नाही, पण ती पहिल्या प्रेमाची आठवण त्या लग्नाच्या बेडीत गुदमरून जाऊन एके दिवशी लोप पावते याचे दु:ख होते.

घर पाहता-पाहता ती बेडरूम मध्ये गेली. तिथला डबलबेड पलंग पाहून का कोण जाणे ती काही क्षण स्तब्ध झाली आणि नंतर एकटीच बडबडू लागली, “माझ्या घरीसुद्धा असाच पलंग होता. सागवान लाकडाचा. त्यावर पिवळ्या रंगाची चादर आणि उशा असायच्या. आई-बाबा रोज रात्री न विसरता माझ्यासाठी अंगाई गीत गायचे आणि मला गाढ झोप लागेपर्यंत थोपटत राहायचे. प्रभाकर परांजपेंच्या घरातल्या त्या पलंगावर मला तशी झोप कधीच लागली नाही. सतत भांडणाच्या आवजांनी जाग यायची............”

तिच्या डोळ्यातून अश्रुंच्या धारा वाहू लागल्या आणि बडबडत-बडबडत ती चक्कर आल्यासारखी पलंगावर पडली. मी पटकन पलंगावर उडी मारली, फतकल मारून बसलो आणि तिचे डोके उचलून माझ्या मांडीवर ठेवले. व्यवस्थित झोप न मिळाल्याने तिला ग्लानी आली होती. त्या अवस्थेतही ती मुसमुसत होती. मी तिच्या डोक्यावरुन हात फिरवत ‘लिंबोणीच्या झाडामागे’, ‘निज माझ्या नंदालाला’ अशा मला आठवतील ती अंगाई गीते जमेल त्या सुरात गात राहिलो. हळू हळू तिचा आवाज बंद झाला आणि ती गाढ झोपी गेली.

मी तिचे डोके मांडीवरून काढून उशीवर ठेवावे असा विचार करून मी उठू लागलो. पण तेव्हा मला जाणवले, ती माझ्या डाव्या हाताला घट्ट मिठी मारून झोपली होती. आता हात सोडवण्यासाठी तिला उठवावं लागणार होतं, पण ती एका लहानशा निरागस मुलीसारखी शांतपणे झोपली होती की तिला उठवणे माझ्या जिवावर आलं. मग मी देखील तसाच बसून

राहिलो. आता कोणी येण्याची भीतीही नव्हती. शेजारीच तिची पर्स पडली होती. केवळ कुतूहल म्हणून मी घाबरत घाबरत तिची पर्स उघडली तर ती रिकामीच होती. एक छोटी पैशाची पर्स आणि एक पेन होते. मी पहिले तर ते तेच पारकरचं पेन होतं जे मी तिला तिच्या वाढदिवसाला भेट म्हणून दिलं होतं. ते तिनं अजूनही जपून ठेवल्याने मला झालेला आनंद शब्दात व्यक्त करता येणार नाही. ते पेन ‘माझे प्रेम एकतर्फी नाही’ या गोष्टीचा पुरावा होतं. आज संधी साधून तिच्यासमोर मन मोकळं करायचा मी निश्चय केला.

ती लवकर उठण्याची काही चिन्ह दिसेनात. मग मी देखील भिंतीला टेकून बसलो आणि डोळे बंद करून पूर्वीचे ते गुलाबी दिवस आठवू लागलो. मी तिला प्रथम पाहिले, ती पहिल्यांदा माझ्याशी बोलली. हस्तांदोलनाच्या निमित्ताने मी तिला पहिल्यांदा स्पर्श केला. पहिल्यांदा तिच्या घरी गेलो तेव्हा त्या अप्सरेने आपणहून माझे स्वागत केले. गच्चीवरची ती एकांतातली भेट इत्यादी आठवणीत मला कधी झोप लागली समजलेच नाही.

जाग आली तेव्हा प्राजक्ता पलंगावर नव्हती. मी घड्याळ पहिले तर संध्याकाळचे पाच वाजले होते. मी तब्बल सहा तास झोपलो होतो. दुपारच्या वेळी अजिबात न झोपणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला एवढी शांत झोप लागलीच कशी? तेच समजेना. पण त्यापेक्षा प्राजक्ता कुठे गेली? हा प्रश्न जास्ती महत्वाचा होता. मी संपूर्ण फ्लॅट मध्ये तिला हाका मारत फिरलो, पण ती सापडली नाही. वॉचमनला फोन करून प्राजक्ताचे वर्णन करून ‘अशी कोणती मुलगी आपल्या इमारतीतून जाताना पहिलीस का?’ असे त्याला विचारले. तेव्हा तो म्हणाला, “होय साहेब, त्या तुमच्या बरोबर आलेल्या मॅडम ना? त्या तर दोन तासांपूर्वीच निघून गेल्या.”

मी फोन ठेवला आणि मटकन खाली बसलो. मला अगदी एखाद्या अपराध्यासारखे वाटू लागले. इतक्या वर्षांनी ती आपल्या घरी आली आणि आपण तिला साधे पाणी देखील न विचारता कुंभकर्णासारखे झोपून राहिलो, यामुळे मला स्वत:चा प्रचंड राग आला. ती परत त्याच झोपडपट्टीत राहायला गेली असणार असा माझा विश्वास होता. पण तिनं त्या दलदलीत राहणं मला सहन होणारं नव्हतं. तिच्यापाशी आपलं मन मोकळं करून तिला नवीन आयुष्य देण्याचा मी निर्णय घेतला. त्याचे कोणते परिणाम होतील याची मला पर्वा नव्हती. असा विचार करून

मी ताडकन उभा राहिलो आणि पायात बूट घालू लागलो. पण तेव्हाढ्यात माझं लक्ष टेबलावरच्या माझ्या आणि मंदिराच्या लग्नातल्या फोटोकडे गेले. त्या फोटोखाली एक कागद आणि मी प्राजक्ताला दिलेलं पारकरचं पेन ठेवलं होतं. ते प्राजक्ताने माझ्यासाठी लिहिलेलं पत्र होतं. मी ते वाचू लागलो.

*प्रिय सुधाकर,*

*ज्या लोकांकडून तुला माझी कहाणी समजली ती खोटी आहे हे तुझ्या लक्षात आलेच असेल. कारण त्या लोकांना माझ्याबद्दल तीच माहीती होती जी मी त्यांना सांगितली. मला नाइलाजाने माझी ओळख लपवावी लागली. मी मुंबईत आल्यावर एका कॉलसेंटर मध्ये नोकरी करत होते. जेणेकरून एक दिवस आपला संपर्क होईल अशी अपेक्षा होती. पण वर्षभर यश आले नाही. एके दिवशी कशी कोणास ठाऊक प्रमिला परांजपे माझ्या ऑफिसात आली. तिच्या प्रियकराने तिला धोका दिला होता. त्याचं अजून एका ठिकाणी प्रकरण होतं. केवळ पैशासाठी तो प्रमिलासोबत होता. प्रमिलाला हे समजले. तिनं त्याला हवी असलेली रक्कम त्याच्या तोंडावर फेकली आणि लाथ मारून त्याला घराबाहेर हाकलून दिले. एखाद्याने धोका दिल्यावर कशी अवस्था होते हे तिला चांगलंच समजले. तिला तिच्या वागण्याचा पश्चात्ताप झाला. आता तिला आधारासाठी माझ्याशिवाय कोणीच नसल्याने ती भारतात आली. माझा पत्ता शोधून काढला आणि माझ्या घरी येऊन मला 'अमेरिकेत चल' असे सांगत होती. पण मी स्पष्ट नकार दिला.*

*तरीही दर सहा महिन्यांनी भारतात यायची आणि माझ्यामागे तेच टुमणं लावायची. शेवटी कंटाळून मी ती नोकरी आणि घर सोडले. पण कितीही नोकऱ्या आणि जागा बदलली तरी ती मला शोधून काढणार याची मला खात्री होती. ती दर सहा महिन्यांनी भारतात आल्यावर एका आठवडा हॉटेल ताज मध्ये राहायची आणि माझी वाट पाहायची.*

*पण मी विरघळले नाही, कारण मला तुला भेटायचे होते. मला समजून घेणारा तो निस्वार्थी आणि निष्कप्टी सुधाकरच फक्त मला माझ्या आयुष्यात हवा होता. म्हणून मी घरोघरी जाऊन वस्तु विकण्याची नोकरी करायचा निर्णय घेतला आणि माझी ओळख*

*बदलली. शेवटी मला यश आलं. तुझ्या घरी आल्यावर तुझा सुखी संसार पाहून आनंद झालाच, पण तरीही मनातली इच्छा अपूर्ण राहिल्याचं दु:खदेखील झालं.*

*पण तीही माझीच चूक होती. जर मी त्या रात्री गच्चीवर तुला माझ्या मनातली गोष्ट सांगितली असती, तर आज कदाचित चित्र वेगळं असतं. पण संधी निघून गेल्यावर फक्त पश्चात्तापाशिवाय काहीच करता येत नाही हेच खरं. तरीही मी समाधानी आहे कारण तू मला पुन्हा एकदा, एका दिवसाचं का होईना, पण बालपण जगू दिलंस. माझ्या मनावरचं आई-वडिलांच्या विरहाचं ओझं हलकं केलसं. तुला एक गोष्ट सांगायची आहे.*

*मी प्रमिला परांजपेंचा 'आई' म्हणून स्वीकार केला आहे. आज रात्रीच्या विमानाने मी माझ्या आईसोबत कायमची अमेरिकेला निघून जाणार आहे. मी हे तुला सांगितलं असतं तर तू कदाचित मला जाऊ दिलं नसतसं. म्हणून मी तू झोपलेला असतानाच निघून आले. तू सुखी रहा. मला शोधण्याचा प्रयत्न करू नकोस. त्यापेक्षा मंदिरावर मनापासून प्रेम कर आणि तिला कायम आनंदात ठेव. मी लग्न करेन किंवा करणारही नाही. पण काहीही झालं, तरी तू माझं 'पहिलं प्रेम' होतास हे सांगताना मी कधीच घाबरणार नाही. एक विचारू? तू देखील जगासमोर मी तुझं 'पहिलं प्रेम' होते हे मान्य करशील का?...........*

*तुझीच*

*प्राजक्ता.*

ती चिठ्ठी वाचून मी पुन्हा त्याच दिवसासारखा ढसा-ढसा रडलो. पण त्या दिवशी एक निश्चय केला की प्राजक्ताचं आणि माझं नातं कधीही लपवायचं नाही. मंदिरा माहेरून परत आल्यावर मी तिला प्राजक्ताची दोन्ही पत्रं दाखवली आणि आजपर्यंत तिच्यापासून लपवून ठेवलेली माझी आणि प्राजक्ताची गोष्ट कोणताही आडपडदा न ठेवता तिला सांगितली.

मंदिरानेदेखील मोठ्या मनाने मला माफ केले आणि मी देखील मनावरचा भार उतरला गेल्याने समाधानी झालो.

या गोष्टीला आता दोन वर्षे झाली. दरम्यान मी घरात प्राजक्ताचा विषयही काढला नाही किंवा तिला शोधायचा प्रयत्नही केला नाही. पण अजूनही अस वाटतं मी मंदिरासोबत असताना प्राजक्ता तिच्या नवऱ्यासोबत किंवा एकटीचं समोर येईल आणि मी न घाबरता व न लाजता मंदिराला सांगेन, “ही प्राजक्ता. माझं पहिलं प्रेम.”

*****समाप्त*****

कशी वाटली माझी आणि प्राजक्ताची कहाणी? आवडली का? शेवटपर्यंत वाचलीत याचा अर्थ आवडलीच असणार म्हणा. ही गोष्ट वाचताना तुम्हाला कुठेतरी तुमच्या पहिल्या प्रेमाची आठवण नक्कीच झालीच असेल आणि त्या आठवणींनी तुमच्या डोळयांच्या कडा पणावल्या असतील याची माला खात्री आहे. त्यामुळे मी सर्वांना विनंती करतो की वेळीच व्यक्त व्हा. आपण बऱ्याचदा आपलं प्रेम व्यक्त करायचे धाडस करत नाही आणि संधी निघून गेल्यावर फक्त हळहळ व्यक्त करीत राहण्याशिवाय आपल्याकडे काहीच पर्याय नसतो. काही नशीबवान लोकांना आपले प्रेम व्यक्त करण्याची दुसरी संधी देखील मिळते. पण समजाच्या रूढी आणि परंपरांपायी ते आपल्या प्रेमाचा बळी देतात आणि त्यांचे प्रेम माझ्या प्रेमासारख्या 'कहाण्या' बनून फक्त पुस्तकात बंदिस्त होते.

तुमचा अभिप्राय जाणून घेण्यासाठी मी आतुर आहे.

धन्यवाद.

सुधाकर अशोक तळवडेकर.

मोबाईल आणि whatsapp नं. : 8108819800

ई मेल : sudhakartalawadekar8108819800@gmail.com

फेसबूक : https://www.facebook.com/sudhakar.talawadekar

पत्ता : ६,निशिला निवास, ८,जयप्रकाश नगर, रोड नं.२, गोरेगांव (पू), मुंबई ४०००६३

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com